नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/05/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

# सराईत गुन्हेगार हनीफ उर्फ इलू हफीज अंसारी याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत येणाऱ्या वलनी परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार हनीफ उर्फ इलू हफीज अंसारी, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ०६, वलनी, पोस्टे खापरखेडा हा मागील ४ वर्षापासून वलनी, पिपळा डाकबंगला, चनकापूर, खापरखेडा, पारशिवनी या परिसरात गुंडगिरी करुन नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा खापरखेडा परिसरात साथीदारांसह कट रचुन खुन करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन शासकीय कामात अडथळा निर्माण करून जिवे मारण्याची धमकी देणे, साथीदारांसह रेती चोरी करणे, कोळसा चोरी, बेकायदेशीर जमाव जमवुन शासकीय सेवकास मारहाण करून त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देणे सारखे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक करुन कारागृहात पाठविले आहे. परंतु हनीफ याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु हनीफ याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. हनीफ याचे कृत्य सामाजिक सुव्यस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. २९/०५/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी हनीफ उर्फ इलू हफीज अंसारी याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, श्री प्रविण मुंडे ठाणेदार पो.स्टे. खापरखेडा, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, निलेश बर्वे, विजय डोंगरे, शैलेश यादव, आशिष भुरे, शाम रामटेके, पोलीस नायक, प्रदीप मने, मुकेश वाघाडे, राजु भोयर यांनी पार पाडली.

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा लोहडोंगरी येथे दिनांक २८/०५/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक २९/०५/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— भुषन दामोधर घरझाडे, वय २७ वर्ष, रा. लोहडोंगरी हे शेतामध्ये फिरायला गेले असता शेतामध्ये फिरता फिरता ट्रॅक्टरजवळ ठेवलेला नागरनी यंत्र (कल्टीवेटर) दिसला नाही आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आला नाही. आजुबाजुच्या व गावात विचारपुस करून (कल्टीवेटर) बाबत शोध घेतला असता मिळुन आला नाही फिर्यादीच्या मालकीचे शेतामध्ये ठेवलेले जुने नागरनी यंत्र (कल्टीवेटर) अंदाजे किंमती १०,०००/—रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मंगेश सोनटक्के पोस्टे रामटेक मो. नं. ९८३४४५३५६५ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. पारशिवनी : —** दिनांक २८/०५/२०२३ चे १५/४५ वा. ते १८/०० वा. सुमारास फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १३ वर्ष ८ महिने ही टयुशनला जाते असे सांगुन घरून निघुन गेली तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बासोडे मो. क्र ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**